# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## जाहिरात

नगर पथ विक्रेता समितीमधील सदस्यापैकी पथविक्रेत्यांचे प्रतिनिधी व्यतिरिक्त अन्य सदस्याची नगर पथविक्रेता समिती गठीत करण्याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार 'महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६' मधील नियम ११ (२) (ख) (दोन) ते ११ (२) (ख) (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील संघटनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तीची नगर पथविक्रेता समितीवर सदस्य म्हणून नियम १२ मध्ये घालून देण्यात आलेल्या निकषाच्या आधारावर नेमणूक करण्यासाठी खालिल प्रमाणे नमुद संघटनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीकडून अर्ज मागविण्यासाठी क्र.ठामपा/पिआरओ/अति.वि./१९२१/२०१६-१७ दि.७-१२-२०१६ अन्वये दि.८-१२-२०१६ रोजीच्या दै. जनादेश, दै. गांवकरी, दै.सन्मित्र, दै.ठाणे वैभव या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदर जाहिरातीस अल्प प्रतिसाद मिळाल्याने व सर्व प्रवर्गासाठी आवश्यकतेप्रमाणे अर्ज प्राप्त न झाल्याने पुन्हा जाहिरात देऊन खालिल प्रमाणे नमुद संघटनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | इतर मंडळे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| नियम ११ (२) ख. | (दोन) अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना (Non-Government organisations and community based organisation) | ०२ |
| | (तीन) निवासी कल्याण संघ (Resident Welfare Associations) | ०२ |
| | (चार) व्यापारी संघाचा प्रतिनिधी (Representative of Traders Association) | ०१ |
| | (पाच) पणन संघाचा प्रतिनिधी (Representative of Market Association) | ०१ |

खालील अटी/शर्तीची पुर्तता करणाऱ्या संघटनेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तींनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे नावे प्रशासकीय भवन येथील नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, पाचपाखाडी, चंदनवाडी, ठाणे (प.) येथे ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत आवश्यक कागदपत्रासह लेखी अर्ज सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या व अपुर्ण कागदपत्रासह सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**अटी / शर्ती :-** (१) संघटनेची किंवा संघाची नोंदणी, क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे केलेली असावी.
(२) संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
(३) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे.
(४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.
(५) संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.

तसेच ज्या संघटना/संघाच्या प्रतिनिधींनी यापूर्वी ज्या प्रवर्गासाठी संपूर्ण आवश्यक कागदपत्रासह अर्ज केलेला आहे. त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

मा.आयुक्त तथा अध्यक्ष नगर पथ विक्रेता समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे. यांचे मान्यतेने.

Sd/-
उपआयुक्त
अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे.